# विनोबा-वार्ता

दैनिक साम्ययोग

मासिक वर्गणी १.५० न. पं.

अंक : १२१ ) वर्धा, गुरुवार ता. ६ ऑगस्ट १९६४ ( मूल्य ५ न. पं.


# अणुयुगात क्रियाशक्तिपेक्षा भाव मूल्याला अधिक महत्व

( विनोबांचे महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांच्या शिबिरातील भाषण )



येथे येण्यापूर्वी पंधरा वीस मिनिटे मी झोप घेऊन आलो. झोपलो म्हणजे आम्ही ब्रह्मलोकात जातो. त्यावेळी भारतात, महाराष्ट्रात किंवा ब्रह्ममंदिरात राहत नाही. तेव्हा येथे बोलण्यापूर्वी ब्रह्मलोकात जाऊन फेरफटका मारून यावा, तेथे मिळेल ते घेऊन येऊन बोलावे असा मनात विचार होता.

हे महाराष्ट्राचे शिबिर आहे. लोकांना विचार करण्याची सवय आहे की भारताचे काय महात्म्य आहेत, महाराष्ट्राचे काय वैशिष्टय आहे आणि आपल्या जिल्हयाचे काय गुण आहेत वगैरे. तसा महाष्ट्राचा महिमा पाहू इच्छितील. पण मला तसे काही दिसत नाही. माणसांचा जो महिमा असेल त्यापलिकडे अधिक किंवा काही कमी असेल असे आढळले नाही. दुसरे मानव जसे तसाच महाराष्ट्राचा माणूस. हिंदुस्थानच्या बाहेर शरीराने मी हिंडलो नाही पण मनाने हिंडलो त्यांचे प्राचीन आर्वाचीन साहित्य नाना भाषातून वाचण्याचा सुयोग लाभला पण मला मानवी मन येथून तेथून सारखेच आढळले. म्हणून अेखाद्या प्रांताचा महिमा माझ्या लक्षात येत नाही.

## ज्ञानदेवाचा उपकार

महाराष्ट्राचा महिमा सांगण्यासारखा नसला तरी महाराष्ट्राचे स्मरण झाल्याबरोबर मला पहिले स्मरण ज्ञानदेव महाराजांचे होते. आणि त्यांनी जो बोल काढला तो आठवतो.

‘ माझा मराठाची बोल कौतुके
अमृताते पैजा जिंके

मी मराठीत बोलणार व सहज बोलणार व तो बोल असा की तो अमृतालाहि जिंकणारा आहे. अेके ठिकाणी त्यांनी म्हटले ‘ माधुर्यं पायी घाली ’ साक्षात माधुर्यं सुद्धा लोटांगण घालील. त्यांच्या सबंध ग्रंथात कटु शद्ब नाही. आता हा विशेष काही महाराष्ट्राचा किंवा मराठी भाषेचा म्हणता येत नाही. तो ज्ञानदेव महाराजांचा विशेष आहे.

कसे बोलावे ? ज्ञानदेव महाराज म्हणतात–

‘ साच आणि मवाळ
मितले आणि रसाळ
शब्द जैसे कल्लोळ
अमृताचे ’

त्याला अमृताशिवाय लहान उपमा सुचतच नाही. मला पुष्कळ वेळेला वाटते ज्ञानदेवाची येवढी जरी शिकवण अंगी मुरली तरी जग जिंकू. नंतर त्यांनी उपमा दिली आहे. उपमा देण्यात ते सम्राटच आहेत. जसे गंगेचे पाणी असते इतके मऊ की बुबुळाला देखील त्रास देत नाही. आणि असे असून सुद्धा इतके प्रखर की खडकहि भेदते. वाणीमध्ये सत्य प्रगट व्हावे खडकाला भेदणार आणि ते प्रगट करतांना इतक्या माधुर्याने प्रकट व्हावे की हृदयाला शीतलता येईल.

तोडायाला संदेह जैसे तीक्ष्ण लोह
श्राव्यत्वे तरी माधुर्यं पायी घाली

शब्द बुद्धीला झोंबावा पण त्याने हृदय रिझवावे. शब्द हृदयाला झोंबणारा नसावा. अशी त्याने मर्यादा घालून दिली. ती पाळली तर जगातील किती तरी समस्या त्या मर्यादेने दूर होतील.

मग कर्तव्य काय ह्याबाबत बोलतांना म्हणतात

‘ इये मराठीचीये नगरी
ब्रह्मविद्येचा सुकाळ करी ’

ह्या महाराष्ट्रात ब्रह्मविद्या सार्वजनिक झाली पाहिजे. ब्रह्मविद्या कशी ? तर सुखच घावे व सुखच घ्यावे. सुखाची देवघेव करावी. हे ब्रह्मविद्येचे जीवनातले स्वरुप अशी त्यांची शिकवण. कर्तव्यबोध हा दिला की ब्रह्मविद्येचा प्रचार व्हावा.

आणि चिंतन करतांना विश्वापेक्षा कमी बोलतच नाही.

‘ आता विश्वात्मके देवे
येणे वाग्यज्ञे तोषावे ’

हा जो वाग्यज्ञ झाला त्याने विश्वात्मक देव संतुष्ट होवो.

भक्ताचे लक्षण सांगितले

‘ हे विश्वचि माझे घर
ऐसी मति जयाचि स्थिर ’

त्यांची गृहकल्पना संकुचित नाही.

स्थितप्रज्ञाचा विहार वर्णन करतांना म्हणतात

‘ विचरे विश्वामाजी
विश्वचि होऊनी ’

विश्वामध्ये विश्व बनून हिंडतो. किर्तनकार निघावा. सर्व लोकाना रिझवीत चालला आहे. नाम लावण्याने उज्वल करीत चालला आहे.

‘ नामघोष गौरवे
धवळले विश्व ’

नामघोषाने विश्वच उजळून टाकले. त्यांच्या वाणीत विश्वापेक्षा कमी नाही.

मनोवशा सांगतात

“ विश्वाचे आर्त माझ्या
मनी प्रकाशले ”

सबंध जगाचे दुःख माझ्या मनात प्रगट झाले आहे.

तेव्हा अशी शिकवण महाराष्ट्राला साहित्याच्या उगमस्थानी लाभली आहे. म्हणजे हे आपल्या सगळयांना मराठी भाषिकाना अगदी लहानपणी मिळालेले बाळकडू नव्हे तर बालामृत आहे. महाराष्ट्राचा स्वभाव कसा आहे ते आपण जाणतो. तो कसा असावा हे ज्ञानदेवानी सांगितले की असा असा असू दे.

मी सहज ह्या वचनाचा विचार करीत येथे येत होतो. ‘विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले ’., तेव्हा आजच्या सभेत काही विचार करून न येता स्वैरसंचार करीन; विश्वात करीन; असे ठरवून आलो. विश्वापेक्षां कमी बोलायचे नाही. आणखी त्यांना अणुयुग येणार ह्याची कल्पना आलेली दिसते.

‘ रखुमादेवी वरू
अणु प्रमाण भासला ’

मला भगवान अणुप्रमाणे दिसू लागला असे म्हणाले. त्यांच्या प्रतिभेला अणुयुगाची कल्पना आलेली दिसते. ते आता प्रगट झालेले आहे आणि अणुशक्ति हिंसक शक्ति नाही. ती संहारक शक्ति आहे. आणि सर्जक होऊ शकते. ती सर्जक किंवा संहारक आहे हिंसक नाही. सर्जनातहि हिंसा होते. व संहारात तर होतेच होते. ती होत असली तरी अणुशक्ति ही स्वयमेव हिंसा शक्ति नाही. ती अक्षोभ शक्ति, विज्ञान शक्ति आहे. आणि संहाराची गंमत अशी की ती समानतेने संहार करते. लढणारे न लढणारे, माणसे, जनावरे हा कसलाच भेद करीत नाही. आणि ज्या दोन राष्ट्रांचे युद्ध होईल त्यांच्यापुरताच संहार मर्यादित राहतो असेहि नाही; बरे वाईट हा पण भेद तिच्याजवळ नाही. अगदी क्लीनशेव्ह, सर्वांना साफच ती करते.

अणुयुगात ही संहारक शक्ति जशी हातात आली तशी सर्जक शक्ति पण हातात आली आहे. आता काही दिवसांनी अेका माणसाचा अवयव दुसऱ्याला लावता येईल, जनावराचा माणसाला लावता येईल. जसे ह्या मोटारीचे पार्टभाग-त्या मोटारीला लावतात तसे माणसाचे लावता बदलवता येतील. आणि स्वतंत्र रीतीने माणूस प्रयोग शाळेत निर्माणहि करता येईल. आणि मेलेले उठवता येतील. आणि आता ते विमान नुकतेच चंद्रलोकावर जाऊन धडकले आहे. आतापर्यंत दुरूनच फोटो घेत असत. आता तेथे माती आहे की धूळ आहे ह्याचे फोटो मिळाले आहेत.

## विश्वाचे नवे दालन उघडले

तेव्हा ज्ञानदेव जे विश्व म्हणतो ते अनुभवणे संभव आहे. चंद्र व पृथ्वी ह्यांच्यात व्यवहार चालणे शक्य आहे. आणि जेंव्हा मी कल्पना करतो तेव्हा अेका नवीन सृष्टीचे दर्शन होते. पंचेंद्रियाचा मनुष्य आपल्याला माहित आहे. त्यापेक्षा कमी चार–तीन–दोन इंद्रियाचे प्राणी आपल्याला माहित आहेत. तसेच सहा सात इंद्रियांचे प्राणि सुद्धा इतर ग्रहावर सापडणे अशक्य नाही. तेव्हा काय काय होईल पाहू लागलो तर बुद्धि कुंठित होते. ते अज्ञात विश्व खुले होत आहे. अज्ञात अज्ञातच असले तरी बरेच ज्ञात होत आहे. रेडिओ अॅस्ट्रानॉमी सांगते की आज ब्रम्हांडाच्या अेका टोकात लाखो चंद्र आणि कोटयावधि सूर्य आहेत. असे विज्ञानाने क्षेत्र उघडले आहे.

हे सर्व असले तरी आमची आई जे शब्द बोलायची त्यापलिकडे गति नाही. ती कान धरायची आणि मंत्र म्हणायची.

अनंत कोटी ब्रम्हांड नायका, माझे अपराध क्षमा कर. आता ह्या अनंतकोटी ब्रम्हांडाच्या पलिकडे शब्दच नाही. अशी ही विशाल सृष्टि पूर्वी मनात होती ती आता डोळयात येऊ लागली आहे. अशी विशालता व दळणवळणाची साधने उपलब्ध झाली आहेत व पूर्वी जी कामे दहा वर्षात व्हावयची ती आता दहा मिनिटात होतात. हिमालयासारखे मोठे डोंगर व पॅसिफिक सारखे महासमुद्राचे तळ माणसासमोर लहान झाले आहेत. आणि अमेरिका व जपान ह्यांच्यामधील अंतर १२००० मैल होते ते आता ‘फक्त १२ हजारच मैल’ राहिले आहे. ती दोन शेजारी राष्ट्रे झाली आहेत. आणि एका देशातील घटनेचा परिणाम दुसऱ्या देशावर होत असतो. म्हणून आता कोठे दोन राष्ट्रात भांडण झाले तर दहा हजार मैलावरील राष्ट्रे त्यात मधे पडतात. नाना फडणवीस हा त्या काळचा मुत्सद्दी खंडाळयाच्या घाटापासून तर पुण्यापर्यंतच्या रस्त्याची चिंता करीत असे. आताच्या मुत्सद्यासमोर विश्वांगण असते.

## अणुयुगातील सत्याग्रह भावात्मक राहील

म्हणून आम्ही ह्यापुढे जे काम करू त्याचे भावमूल्य विश्वाचे

www.vinoba.in

पाहिजे. हा बदल दहापंधरा वर्षात झाला. मी नुकताच १ ऑगष्टला बोललो की गांधीजी आले आणि टिळकांचा काळ मागेच पडला. जागतिक युद्धानंतर नवीन शक्तींचा उदय झाला व टिळकांनी विचार मागील परिस्थितीचा केला होता. ते मागे पडले आणि गांधीजींचा सत्याग्रह पुढे आला. आणि ह्या दहापंधरा वर्षात गांधीजींचा सत्याग्रहहि मागे पडला. त्यात क्रियेलाहि महत्व होते. भावनेचे तर होतेच पण क्रियेचेहि होते. आता जो सत्याग्रह होईल तो भावप्रधान राहील. क्रिया गौण होईल. होमिओपॅथीत औषध कमी व साखर जास्त. पोटॅन्सी वाढवायची तर साखर घालायची व घोटायचे व त्याची शक्ति वाढवायची. त्यांची प्रतिज्ञा आहे की तोळाभर औषध आणले तर ते प्रलय कालापर्यंत पुरेल. त्यासाठी वेगळे काही करावे लागणार नाही केवळ साखर घालायची व घोटत जायचे.

औषध कमी, साखर वाढवायची.

घोटणे वाढविले की शक्ति वाढेल.

येथे औषध ही क्रिया, साखर हा भाव. क्रिया जितकी कमी व भावशक्ति जितकी वाढवाल तितकी शक्ति अधिक वाढेल.

ज्ञानदेवाने म्हटले आहे

'तयाची क्रिया ढाळे ढाळे
गळती आहे'

क्रिया कमी होत जाणार ते दिवस आता आले आहेत. आमच्या कार्यात, धांदल, हालचाली ह्यांचे महत्व कमी. व कार्यात केवढी भावशक्ति ओतली ह्याचे महत्व जास्त. म्हणून ह्यापुढचा सत्याग्रह भावनेने वाढेल. व क्रियेने कमी होईल. बघता बघता पूर्वीच्या शोधकांनी शोधलेले शोध मागे पडले, साधने गौण ठरली. व नवीन साधनांची गरज निर्माण झाली. साम्यसूत्रात आम्ही लिहिलेच आहे.

## क्रियोपरमे वीर्यवत्तरम्

क्रियेचा जेवढा उपरम होईल तेवढे कार्य वीर्यवत्तरम होईल. ते दिवस आता आले आहेत. तेव्हा तुम्ही शेदोनशे सेवकांनी विचार करावा की आमच्या कार्याचे भावमूल्य काय? जो ठराव रायपूरला आम्ही केला त्याच्याच प्रकाशात विचार करायचा आहे. ग्रामाभिमुख खादी, शांतिसेना आणि ग्रामदान ह्या संबंधी चर्चा करणार आहो. पण य चर्चेला आधार भावशुद्धीचा पाहिजे. विश्वव्यापक भावना झाली तर आपण जेथे असू तेथे आपल्याला बळ लाभेल. आपण कमजोर नाही तर बलवान आहो असे वाटेल.

## नम्रता व प्रेमाने समस्या सुटतील.

नवीन खादीचे उद्घाटन करतांना मी सांगितले होते की तुमच्या समोर जो प्रश्न आहे त्याच्या भिन्न, विपरित असा प्रश्न माझ्या समोर आहे ह्यांच्या समोर मजबूत धागा कसा निघेल हा प्रश्न आहे तर माझ्यासमोर कच्चा धागा कसा निर्माण होईल हा विचार आहे.

'काचे रे तांते' मीराबाई म्हणते मी कच्च्या धाग्याने प्रेमरज्जूने तो प्रभु बांधला आहे.

जो तो पक्का धागा आहे ती अेक बाह्य वस्तु आहे. परंतु हा कच्चा धागा कसा बनवायचा ज्याच्या योगाने ह्या संबंध विश्वाला खेचू शकू व त्यांच्याकडे खेचले जाऊ हा प्रश्न आहे. त्यात पीळ कामाचा नाही. तो अहंकार, ताठा म्हणजे पीळ तो गेला म्हणजे तो धागा कच्चा होईल.

लोकमान्यांना अेकदा कोणी विचारले की महाराष्ट्रात पुन्हा शिवाजी होईल किंवा नाही? तेव्हा ते म्हणाले ईश्वर त्याच त्याच ग्रंथाच्या आवृत्ति काढीत नसतो. नवीन लिहितो. मावळ्या लोकात शिवाजी झाला कारण त्यांना अभिमान नव्हता. आता आम्हाला अभिमान असला तर ईश्वर म्हणेल आता मोठा मनुष्य दुसरीकडे पाठवू. दुसरीकडे कदाचित हे नाटक होईल. मी सांगू शकत नाही नाटक कोठे होईल. घाट मात्र आपण येथे घातला आहे.

अेक गृहस्थ मला भेटले व ते म्हणाले तुम्ही अनेक भाषा शिकला पण एस्परॅंटो नाही शिकला. तो म्हणाला माणसाने एक आपली मातृभाषा व दुसरी एस्पॅरॅंटो ह्या दोनच भाषा शिकाव्या. त्यांनी युगोस्लॉव्हियातून मला ती भाषा शिकविण्यासाठी मनुष्य पाठविला. १८ दिवसात मी ती भाषा शिकलो आणि त्यापेक्षा कमी दिवसात विसरलो.

अेस्पॅरॅंटो भाषा तयार करणारांनी फार मोठा पराक्रम केला ह्यात शंकाच नाही.. जगातील भाषांचे अध्ययन करून स्वतंत्र सोपे शब्द, लिपी, व्याकरण त्यांनी तयार केले आणि ७०-७५ वर्षात अेक चांगली भाषा तयार केली व जगातील ३० लाख लोकांना तिचे शिक्षण दिले व चांगले ५०-६० उत्तम ग्रंथ त्या भाषेत त्यांनी तयार केले. विश्वामित्राने जशी प्रतिसृष्ट निर्माण केली तसेच हे काम.

मी म्हटले केवळ तीस चाळीस लाखच लोक तुमची भाषा शिकले आहेत. तसे बाह्य दृष्ट्या पाहिले तर हे अेक विलक्षणच काम झाले असे म्हणावे लागेल. मी विचारले इंग्रजी भाषाच शिकली तर काय वाईट? तो म्हणाला त्या भाषेचे वैर करणारे पुष्कळ आहेत. आणि तिचे अभिमानीहि पुष्कळ आहेत. तेव्हा न्यूट्रल भाषा पाहिजे. मी म्हणालो व्यापार, विज्ञान ह्यांचे शिक्षण इंग्रजीने दिले. म्हणून तिची गरज लोकांना वाटली. पण विश्वभाषा कोणती होईल? जी करेल ती होईल. जी भाषा विश्वशांतीची युक्ति काढील ती भाषा जग स्विकारेल. समजा हिंदीने हे काम केले तर ती विश्वभाषा होईल. मराठीवाल्यांनी ती दाखविली तर ती भाषा विश्वभाषा होईल.

## आपल्या कामाचा संबंध विश्वाशी जोडा.

विश्वशांतीची गरज वेदांताला तर केव्हाच भासली. पण विज्ञानालाहि आता ती वाटत आहे. तेव्हा आता विज्ञान व आत्मज्ञान दोघेहि विश्वशांतीची निकड सांगतात. विश्वशांतीसाठी काय करावे? तर असे मानण्याची, बोलण्याची अनुभविण्याचीं शक्ति पाहिजे की हे काम दिसायला लहान असले तरी असायला महान आहे. आकृति लहान पण प्रकृति फार मोठी आहे. जसा शालीग्राम लहान असावा पण सबंध ब्रम्हांड त्यात साठविलेले असावे, भावनेने त्यांत सबंध ब्रम्हांडाची पूजा करावी तसे हे आहे. ह्या कर्माने आम्ही सबंध विश्वाशी अेकरूप होत आहोत असे असायला, वाटायला हवे..

मला भेटायला पाच पन्नास देशांची मंडळी येऊन गेली. युरोपातील तर बहुतेक सर्व देशाचे लोक येऊन गेले. ते मला विचारित असतात की तुमचा उद्देश्य काय आहे? मी सांगायचा Kingdom of kindness करूणेचे राज्य स्थापन करणें हा माझा हेतु आहे. येशू म्हणत असे Kingdom of God आणायचे आहे.

तेव्हा तुम्हाला तुमच्या वस्तूत समता-प्रेम-दिसते काय? तर मग खादीचे भावमूल्य वाढले. आम्हाला आमच्या वस्तूचे भावमूल्य वाढवावयाचे आहे.

ग्रामदान, शांतिसेना ह्यातून जर समता, प्रेम, करुणा ह्यांचा विकास होत असेल तर त्यांचे भावमूल्य वाढले म्हणायचे. अगदी लहानशी गोष्ट; पण तिच्यापासून मला जेवढा आनंद मिळाला तितका कशापासूनहि झाला नाही. ती म्हणजे 'सर्वोदयपात्र'. 'मूठभर धान्य जगभर शांति.' हे सर्व सबंध राष्ट्राला करुणेची, समतेची दीक्षा द्यावयाचीं आहे अशा कल्पनेने भारले जाऊन करू तेव्हां आपण केलेल्या प्रयत्नांचे भावमूल्य वाढेल आणि मग थकवा येणार नाही. लोक मला विचारतात 'तेरा वर्षे' फिरल्याने थकवा वाटत नाही काय? त्याला ८० वर्षे घरात बसून जर थकवा नाही तर मला फिरून थकवा वाटत नाही. आपल्या घरात मी फिरत असतांना मला थकवा कोठून येणार? तो मात्र घरात बसून कंटाळणार.

ती दोन पोरे पहा. पोरेच ती. (सतीश व प्रभाकर मेनन) रशिया, इंग्लंड, अमेरिका कोठे कोठे गेली. सत्याग्रह केला, प्रचार केला व आता जपानला उतरली. निघतांना मला आशिर्वाद मागायला आली. मी म्हटले माझा आशिर्वाद तर आहेच. पण तुमचे रक्षण चक्र गदा करतील.

मी शंख फुंकत जातो. मला कोणी पदवी देणार नाही पण माझ्या मनात येते सरकार लोकांना पद्मभूषण, महावीर चक्र ह्या पदव्या व बिरुदे देते. तशी परमशंख पदवी काढली तर शंख मी होईल. रक्षणासाठी चक्र व गदा ही दोन्ही आहेत.

मी त्यांना म्हणालो मी तुम्हाला चक्र व गदा देतो. तुम्ही हिंडा पण मांसाहार करू नका. हिंदुस्थानची ही दैवी संपत्ति आहे. ती फार मोठ्या तपश्चर्येनंतर व प्रयासाने थोडी फार सिद्ध केली आहे. तेथे प्रवासात तुम्हाला आपत्ति येईल पण ती टेक राखा. व दुसरी गोष्ट सांगितली हातात पैसा घेवू नका. आणि त्या दोघांनीं ते कबूल केले व ते तसेच हिंडले. त्यांनी मांसाहार केला नाही व पैसा हाती घेतला नाही. तेव्हा त्यांनी भावमूल्याच्या दृष्टीने फार मोठे काम केले. तेव्हा आमच्या कामाचे भावमूल्य वाढले पाहिजे. नाही तर थकून जाऊ.

माझी तर व्यवस्था होते. पण आमची, महाराष्ट्राची, मुले जातात, मार खातात, त्रास सहन करतात. महाराष्ट्रात त्यांच्या निर्वाहाची काही योजना नाही. इज्राइल मधून आल्यावर शेंदुर्णीकर वकील मला म्हणाले त्या लोकांना पैशाची काही ददातच नाही. त्यांचे वाक्य पूर्ण होण्याच्या आतच मी उद्गारलो अन् आम्हाला बिनपैशाची ददातच नाही.

( क्रमशः )

संपादक :-श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक:-श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रक:-गो. भा. जोशी, भास्कर प्रेस, वर्धा.
स्वामित्व:-महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग दैनिक ता. ६-८-६४ अं.१२१ र.नं.ए.न.२९५
विनोबा वार्ता, मगनवाडी, वर्धा ( म. राज्य)
श्री.

www.vinoba.in